# महाराष्ट्र शासन

# गृह विभाग अर्थसंकल्प : २०१८-१९


## समर्थन

### अर्थसंकल्प अध्ययन केंद्र

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०

Email: samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन : **मुक्ता भारती**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९६६५००६४२९

विशेष सहाय्य :
**स्नेहा घरत,अनुश्री करवा, सुनिल मिश्रा, विलास सुवरे, राजश्री कदम, उमेश सांगळे**

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी



**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏ ०२२-२२००३०६०
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०११-१२ पासून २०१८-१९ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:
रुपेश कीर -९८९२९३९६१७

**मार्गदर्शक-विवेक पंडित**

संस्थापक, समर्थन

# गृह विभाग

## ठळक वैशिष्ट्ये :

- ☞ वर्ष २०१६ मध्ये ४.३१ लाख दखलपात्र गुन्हे दाखल, वर्ष २०१५ च्या तुलनेत १.८२% वाढ.
- ☞ वर्ष २०१६ मध्ये भा. दं. वि. प्रमाणे २.६२ लाख व विशेष आणि स्थानिक कायद्यांप्रमाणे १.६९ लाख गुन्हे दाखल.
- ☞ दर ३ मिनिटास सरासरी २ दखलपात्र गुन्हे दाखल.
- ☞ भा.दं.वि. प्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति २ मिनिटास तर विशेष आणि स्थानिक कायद्याप्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति ४ मिनिटास दाखल.
- ☞ राज्याचे भा. दं. वि. गुन्ह्यांचे प्रमाण २१७.१ आहे. गुन्ह्यांचे सर्वाधिक प्रमाण औरंगाबाद शहर या घटकामध्ये ४८९.३ (१ लाख लोकसंख्येशी)
- ☞ मागील वर्षापेक्षा भा. दं. वि. प्रमाणे दाखल झालेल्या गुन्ह्यांत ४.९७% घट
- ☞ एकूण भा. दं. वि. चे प्रमाण गुन्ह्यांपैकी २.४ % भाग अल्पवयीन गुन्ह्यांचा.
- ☞ एकूण भा.दं.वि.चे गुन्ह्यांपैकी ३९.६७% गुन्हे ९ मोठ्या शहरांमध्ये (आयुक्तालयांमध्ये) दाखल, त्यापैकी ३८.१६% गुन्हे एकट्या मुंबई शहरात दाखल.
- ☞ स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांत ०.४८% वाढ. सर्वाधिक गुन्हे मुंबई शहरात (५,११८) दाखल असून संपूर्ण महाराष्ट्राचे गुन्ह्यांचे प्रमाण (दर १ लाख स्त्री लोकसंख्येस) ५४.४४ तर सर्वाधिक गुन्ह्यांचे प्रमाण अमरावती येथे (१३५.३१)
- ☞ १८ वर्षाच्या आतील बालिकांवरील बलात्कारामध्ये २०१५ च्या तुलनेत २०१६ मध्ये २.३८% घट.
- ☞ स्त्रियांवरील अत्याचाराचे ९२.४ % गुन्हे विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित.
- ☞ २०१५च्या तुलनेत २०१६ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये ३.५२% घट व अनुसूचित जमातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये १६.५६ % घट झाली आहे.
- ☞ वर्ष २०१६ मध्ये राज्यात भा. दं. वि. गुन्ह्यांचे शाबितीचे प्रमाण ३४.३१% आहे. शाबित न झालेले गुन्हे ६५.६९%.
- ☞ ३२ लाख ३८ हजार ४६५ व्यक्तींच्या (राज्याच्या लोकसंख्येच्या २.६१%) भा. दं. वि. खटल्यांची सुनावणी विविध न्यायालयांसमोर प्रलंबित.
- ☞ वर्ष २०१६ मध्ये कर्तव्यावर असलेल्या एकूण जखमी पोलिसांपैकी ४४.८६% पोलीस बेकायदेशीर जमावाने केलेल्या हल्ल्यात जखमी.

☞ वर्ष २०१६ मध्ये राज्यात १७ हजार १९५ व्यक्तींनी आत्महत्या केल्या. १३ हजार ६८२ व्यक्ती रस्त्यावरील अपघातात मृत्यू पावल्या.

☞ वर्ष २०१६ मध्ये संगणक / सायबर गुन्ह्यांत गतवर्षीच्या तुलनेत ८.४३ % वाढ झाली.

☞ राज्यात वर्ष २०१६ मध्ये २२ हजार ५२० वाहने चोरीस गेली व त्यापैकी २८.७१ % वाहने मिळून आली.

☞ राज्यात वर्ष २०१६ मध्ये १ लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६७ पोलीस अहमदनगर, तर ७३ पोलीस पुणे ग्रामीण व पोलीस कोल्हापूर या घटकात प्रत्यक्ष कार्यरत होते.

☞ वर्ष २०१५ च्या तुलनेत वर्ष २०१६ मध्ये भा.दं.वि. गुन्ह्यांमध्ये ४.९७% तर विशेष आणि स्थानिक कायद्याखालील गुन्ह्यांमध्ये १४.४७ % वाढ झाली आहे.

☞ वर्ष २०१६ मध्ये मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये ९.८९ % घट झाली आहे.

☞ स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यात वर्ष २०१५ च्या तुलनेत वर्ष २०१६ मध्ये ०.४८% वाढ झाली आहे.

☞ अत्याचारांच्या एकूण गुन्ह्यांपैकी सर्वात जास्त गुन्हे (२० %) पती व पतीच्या नातेवाईकांकडून अत्याचार या गुन्हे शीर्षाखाली नोंदविण्यात आले आहेत.

☞ हिंसात्मक स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्ये खून, खुनाचा प्रयत्न, सदोष मनुषवध, हुंडाबळी, अपहरण व पळवून नेणे, बलात्कार, जाळपोळ, दंगा, दरोडा व जबरी चोरी या गुन्ह्यांचा समावेश होतो. वर्ष २०१६ मध्ये हिंसामय गुन्ह्यांत ६.३६% घट झाली आहे.

☞ हिंसात्मक स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या प्रमाणामध्ये राज्यामध्ये ठाणे शहर (४५.९३), औरंगाबाद शहर (५७.३६), नागपूर शहर (५२.०६), नवी मुंबई (३५.०६), पुणे शहर (४०.७६), पुणे ग्रामीण (३५.४६), पालघर (३३.२३) व मुंबई शहर (३७.४५) या घटकात झालेली लक्षणीय वाढ गुन्हे प्रतिबंधक यंत्रणांसाठी आव्हान ठरत आहे.

☞ अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये वर्ष २०१५ च्या तुलनेत वर्ष २०१६ मध्ये (३.५२%) तर अनुसूचित जमातीच्या सदस्यांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये (१६.५६%) घट झाली आहे.

☞ विधिसंघर्षग्रस्त बालकांच्या (Juvenile)संख्येमध्ये वर्ष २०१५ च्या तुलनेत वर्ष २०१६ मध्ये (१३.८१%)वाढ झाली असून सर्वात जास्त बाधित वयोगटातील मुले/मुली ही १६ ते १८ वयोगटातील आहेत.

☞ बालकांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये वर्ष २०१५ च्या तुलनेत वर्ष २०१६ मध्ये (४.५८%) वाढ झाली आहे.

☞ वर्ष २०१६ मध्ये राज्यामध्ये रस्त्यावरील अपघातांमध्ये १३,६८२ (म्हणजे दिवसाला ३७.४) व्यक्ती मृत्यू पावल्या असून ३५,७२६ (म्हणजे दिवसाला १००) व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

# गृह विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज जास्त प्रत्यक्ष खर्च मात्र त्यापेक्षाही कमी

आलेख क्र. १ (रु. कोटीत)




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ८२९२ | १००९० | १२०४३ | १३३४१ | १४६०० | १५०९० | १७००७ | १७९६८ |
| सुधारित अंदाज | ८५१६ | १०५५४ | १२१४० | १३३३४ | १५०३३ | १७३११ | १६५३९ | |
| प्रत्यक्ष खर्च | ७७८६ | ९५८३ | १०९७९ | ११७३८ | १३१११ | १५९३५ | | |

*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका) वर्ष २०१७-१८ सुधारित अंदाज व वर्ष २०१८-१९ अर्थसंकल्पीय अंदाज)*

☞ **वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ पर्यंत गृह विभागाला प्रत्यक्ष खर्चासाठी सुधारित अंदाजाच्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नसल्याचे दिसते.**

☞ **वर्ष २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १३ हजार ३४१ कोटी असून देखील त्यावर्षी निधी उपलब्ध होण्याचे प्रमाण मात्र सर्वात कमी म्हणजेच रु. ११ हजार ७३८ कोटी (८८%) आहे.**

☞ **वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ या कालावधीत गृह विभागाला सरासरी रु. ११ हजार ५२२ कोटी इतका निधी उपलब्ध झाल्याचे दिसते.**

☞ **वर्ष २०१८-१९ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १७ हजार ९६८ कोटी आहे. वर्ष २०१७-१८ मधील सुधारित अंदाज रु. १६ हजार ५३९ कोटी होता म्हणजे या अर्थसंकल्पात मागील वर्षाच्या सुधारित अंदाजापेक्षा १ हजार ४३९ कोटी इतका अधिक निधी मिळाला.**

# राज्य अर्थसंकल्पाच्या १०० रुपयाच्या तुलनेत गृह विभागाला मिळतात फक्त ५.७५ रुपये

आलेख क्र. २




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ५.५७ | ५.७९ | ५.८४ | ५.३९ | ५.८१ | ६.२० | ५.११ | ४.८९ |

*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा) वर्ष २०१७-१८ सुधारित अंदाज व वर्ष २०१८-१९ अर्थसंकल्पीय अंदाज)*

☞ वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ या काळात गृह विभागावर एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी ५.७५ % एवढाच निधी उपलब्ध झाला.

☞ वर्ष २०१४-१५ मध्ये उपलब्ध निधी हा इतर वर्षांच्या तुलनेत कमी म्हणजेच ५.३९ % दिसून येतो.

☞ वर्ष २०१६-१७ मध्ये गृह विभागाचे उपलब्ध निधीचे प्रमाण पाहता इतर वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजेच ६.२०% इतके होते.

☞ वर्ष २०१६-१७ मध्ये खर्चाचे प्रमाण ६.२० % असून, वर्ष २०१७-१८ मध्ये सुधारित अंदाजाचे प्रमाण हे ५.११ % आहे. परंतु तेवढा निधी उपलब्ध होणार नाही हे मागील अनुभवावरून सिध्द होते.

☞ वर्ष २०१८-१९ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज ४.८९ % आहे.

# पोलीस

*"पोलीस हा जनतेच्या अनादराचा, गुरुवर्यांच्या टीकेचा, चित्रपटात विनोदाचा - टिंगल - टवाळीचा विषय आहे. वर्तमानपत्रातून त्याला कधीही श्रेय मिळत नाही. सरकारी वकील आणि न्यायाधीश यांच्या सहकार्याअभावी तो निराधार असतो आणि आदरणीय व्यक्तींकडून त्याला तिरस्कार मिळतो, अनेकविध प्रलोभने आणि धोके सतत त्याच्यासमोर उभेच असतात. तो जेव्हा कायद्याचा अंमल करतो तेव्हा त्याचा धिक्कार होतो आणि जेव्हा अंमल करीत नाही तेव्हा तो निलंबित होतो. त्याच्याकडून सैनिकाची, शांतीदूताची आणि शिक्षकाची अपेक्षा करीत असताना त्याला पगार मात्र रोजंदार मजूरापेक्षा कमीच दिला जातो."*

- ऑगस्ट वॉल्लीमोर.

## मुंबईवरील वाढत्या दहशतवादातून आम्ही कोणता धडा घेतला?

आलेख क्र.३ (रु. कोटीत)

**पोलीस या मुख्य शीर्षावरील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च**




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ६६४० | ७८३३ | ९४२० | १०४६९ | ११८५३ | ११५७९ | १२७५२ | १३८६६ |
| सुधारित अंदाज | ६७१९ | ८२११ | ९४२३ | १०३४३ | ११६३२ | १२४०४ | १२५४४ | |
| प्रत्यक्ष खर्च | ६१४२ | ७२९३ | ८२२९ | ८९१३ | ९९१६ | ११७३७ | | |

*स्त्रोत: खर्चाचा प्रधान शीर्षवार नि-विभागवार सारांश -लोकलेखा-मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील २०१७-१८ सुधारित अंदाज व २०१८-१९ अंदाजित खर्च*

- **वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१८-१९ या कालावधीमध्ये पोलीस या मुख्य शीर्षासाठी शासनाने सुधारित अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.**
- **वर्ष २०१६-१७ मध्ये सुधारित अंदाज रु.११ हजार ५७९ कोटी असताना प्रत्यक्ष उपलब्ध झालेला निधी रु. १ हजार १५८ कोटी इतका वाढून त्या वर्षातील खर्च रु. ११ हजार ७३७ कोटी इतका झाला आहे.**
- **वर्ष २०१७-१८ चे सुधारित अंदाज रु. १२ हजार ५४४ कोटी व वर्ष २०१८-१९ मधील अर्थसंकल्पीय अंदाज रु. १३ हजार ८६६ कोटी इतके असले तरी हे अंदाज प्रत्यक्षात उतरणे महत्त्वाचे ठरेल.**

# राज्याचा पोलिसांसाठी सरासरी उपलब्ध निधी फक्त ४.३२ %

आलेख क्र. ४




*(स्रोत : खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च) वर्ष २०१७-१८चे सु. अंदाज व वर्ष २०१८-१९चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- ☞ **वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ या कालावधीत राज्याच्या उपलब्ध निधीच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील उपलब्ध होणारा निधीचे सरासरी प्रमाण हे फक्त ४.३२ % दिसून येते.**
- ☞ **वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत वर्ष २०१६-१७ मध्ये उपलब्ध झालेला निधी ०.१६ टक्क्यांनी वाढला आहे.**

## पोलीस कोठडी की, मृत्यूचे सापळे?

**पोलीस कोठडीत वर्ष २००८ ते २०१६ या ९ वर्षाच्या दरम्यान २७१ संशयित आरोपींचा मृत्यू झाला आहे. वर्ष २०१६च्या ऑक्टोबर अखेरपर्यंत १६ जणांनी कोठडीत अखेरचा श्वास घेतला आहे. या कोठडीतील संशयित मृत्यूंचा छडा लावण्याची जबाबदारी सी.आय.डी.कडे देण्यात येते. मात्र त्यांच्या तपासातील कासवगतीमुळे बहुतांश प्रकरणांचा तपास प्रलंबित असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. पोलीस कोठडीत संशयित आरोपींच्या मृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून यापुढे कोठडीत एकही मृत्यू नको असे मुंबई हायकोर्टाने बजावूनही कोठडीतील मृत्यूचे प्रमाण वाढतेच राहिले आहे. याबाबत न्यायालयाने पोलीस कोठडीत होणाऱ्या मृत्यूबाबत सरकारने पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केल्यास राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये योग्य संदेश जाईल आणि कोठडीत होणाऱ्या मृत्यूला आळा बसेल. यापुढे एकही कोठडीतील मृत्यू नको असे उच्च न्यायालयाने ठणकावले आहे.**

# राज्याचा गृह विभागावरील व पोलीस या मुख्य शीर्षावरील खर्चातील फरक

तक्ता क्र.१ *(रु. कोटीत)*

| वर्ष | गृह विभागावरील खर्च | पोलीस शीर्षावरील खर्च | %वारी |
|---|---|---|---|
| २०११-१२ | ७,७८६ | ६,१४२ | ७८.८८ |
| २०१२-१३ | ९,५८३ | ७,२४८ | ७६.१० |
| २०१३-१४ | १०,९७९ | ८,२२९ | ७४.९५ |
| २०१४-१५ | ११,७३८ | ८,९१३ | ७५.९३ |
| २०१५-१६ | १३,१११ | ९,९१६ | ७५.६३ |
| २०१६-१७ | १५,९३५ | ११,७३७ | ७३.६५ |
| २०१७-१८(सु. अं) | १६,५३९ | १२,५४४ | ७५.८४ |
| २०१८-१९ (अ. अं) | १७,९६८ | १३,८६६ | ७७.१७ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च*

☞ वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ या कालावधीतील गृह विभागावरील एकूण खर्चाच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील खर्चाचे सरासरी प्रमाण ७५.८५ % आहे म्हणजेच उर्वरित २४.१५ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.

☞ वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ पर्यंत पोलीस या शीर्षावर सरासरी रु.८ हजार ६९७ कोटी निधी उपलब्ध झाला.

☞ वर्ष २०१५-१६ शी तुलना करता वर्ष २०१६-१७ मध्ये गृह विभागाला उपलब्ध झालेल्या निधीत रु. १ हजार ८२१ कोटी वाढ झाल्याचे दिसते.

### *पोलिसांवरील वाढता ताण : महाराष्ट्रात १ लाख लोकसंख्येमागे केवळ १७० पोलीस*

महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या १२ कोटी ५ लाख एवढी असून २०१६ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष पोलीस संख्याबळ २ लाख ४ हजार ६५५ आहे. म्हणजेच एक लाख लोकसंख्येसाठी १७० पोलीस आहेत. तर एक लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६५ पोलीस कोल्हापूर, ६७ पोलीस अहमदनगर, तर ७३ पोलीस सोलापूर ग्रामीण या घटकात प्रत्यक्ष कार्यरत होते.

*- स्रोत : महाराष्ट्रातील गुन्हे २०१६*

### महाराष्ट्र राज्यात महिला पोलिसांचे प्रमाण नगण्य

राज्यात २ लाख ४ हजार ६५५ पोलीस कार्यरत असून त्यापैकी महिलांची संख्या २६ हजार २३६ इतकी आहे. एकूण पोलिसांच्या प्रमाणात १२.८१% इतके कमी आहे. राज्यात महिलांची संख्या ५ कोटी ८७ लाख ६० हजार असून त्या प्रमाणात महिलांची भरती पोलीस विभागात होणे गरजेचे आहे.

*- स्रोत : महाराष्ट्रातील गुन्हे २०१६*

# गुन्हे - राज्यभरात १ लाख ७१ हजार गुन्हे प्रलंबित

तक्ता क्र. २

## गुन्ह्याची निर्गती करण्यात गृह विभागाला अपयश

| गुन्ह्याचा प्रकार | आधीचे प्रलंबित गुन्हे | २०१६ मधील दाखल गुन्हे | इतर पोलीस ठाण्यात वर्ग झालेले गुन्हे/तपास बंद | एकूण गुन्हे | तपास न लागलेले गुन्हे | तपासकार्य पूर्ण झालेले एकूण गुन्हे | वर्षअखेर तपासासाठी प्रलंबित राहिलेले गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खून | १२६९ | २२९९ | ७ | ३५६१ | ० | २४०७ | ११५४ |
| खुनाचा प्रयत्न | १६७२ | २६१९ | ७ | ४२८४ | १ | २७३८ | १५४६ |
| सदोष मनुष्यवध | १२९ | १८४ | ० | ३१३ | ० | १६८ | १४५ |
| सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न | ५ | ३ | ० | ८ | ० | ५ | ३ |
| बलात्कार | २०६४ | ४१८९ | २१ | ६२३२ | १ | ४०११ | २२२१ |
| बलात्काराचा प्रयत्न | २ | १२ | ० | १४ | ० | ७ | ७ |
| पळवून नेणे व अपहरण | ४९५६ | ९३३२ | ४ | १४२८४ | ० | ८४९० | ५७९४ |
| दरोडा | ५६३ | ६५६ | १ | १२१८ | ० | ७४३ | ४७५ |
| दरोड्यासाठी एकत्र येणे | १८० | २५५ | ० | ४३५ | ० | २७८ | १५७ |
| जबरी चोरी | ५५४६ | ६०३० | ३ | ११५७३ | ० | ७२१४ | ४३५९ |
| घरफोडी | १२१७२ | १४८३४ | ० | २७००६ | १ | १५८५७ | ११११४९ |
| चोरी | ४५६५२ | ५९०९७ | २१ | १०४७२८ | ६ | ६०६४१ | ४४०८७ |
| बेकायदेशीरपणे एकत्र येणे | ५८४ | ७६४ | १ | १३४७ | ० | ९०५ | ४४२ |
| गर्दी - मारामारी (दंगल) | ४७३२ | ७८९८ | ४ | १२६२६ | १ | ८१२५ | ४५०१ |
| अन्यायाने विश्वासघात | ३५९६ | २०३६ | २४ | ५६०८ | ० | १८८४ | ३७२४ |
| फसवणूक | १४६४६ | ९७९२ | ४७ | २४३९१ | ५ | ९८२१ | १४५७० |
| बनावट नाणी/नोटा | २३८७ | ११८० | २९ | ३५३८ | ० | ७८३ | २७५५ |
| जाळपोळ | ७३० | १३३८ | ३ | २०६५ | ० | १३२७ | ७३८ |
| दुखापत | ५५३८ | ७६४५ | ५ | १३१७८ | १ | ७७८३ | ५३९५ |
| हुंडाबळी | ११८ | २४८ | ० | ३६६ | ० | २४७ | ११९ |
| विनयभंग | ६१६७ | ११३९६ | ८ | १७५५५ | ३ | १२०७२ | ५४८३ |
| छेडछाड (लैंगिक छळ) | १०३६ | ९२४ | ० | १९६० | ० | ८३३ | ११२७ |
| पती /नातेवाईकांकडून छळ | ३९२५ | ७२१५ | ४४ | ११०९६ | १ | ७४८२ | ३६१४ |
| निष्काळजीपणामुळे मृत्यू | ५५५० | १३११६ | २ | १८६६४ | ० | १३३७० | ५२९४ |
| खंडणी | ६७८ | ७८८ | १० | १४५६ | ० | ७६८ | ६८८ |
| मोटार अपघात | १२३६७ | २८३९७ | ० | ४०७६४ | ० | २९१४० | ११६२४ |
| मानवी तस्करी | ५२ | १८ | ० | ७० | ० | ६१ | ९ |
| इतर भा. दं. वि. गुन्हे | ३२३८१ | ७९२४६ | ८२ | १११५४५ | २ | ७०९०९ | ४०६३६ |
| एकूण गुन्हे | १६८६९७ | २७१५११ | ३२३ | ४३९८८५ | २२ | २६८०६९ | १७१८१६ |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे - २०१६)*

☞ **वर्ष २०१६ मध्ये ४ लाख २९ हजार ८८५ गुन्हे तपासासाठी होते. त्यामध्ये मागील प्रलंबित गुन्ह्यांची संख्या १ लाख ६८ हजार ६९७ (३८.३५%) एवढी प्रचंड होती. तर २ लाख ६८ हजार ६९ (६०.९४%) गुन्ह्याचे तपासकार्य पूर्ण झाले तसेच वर्षाखेरीस १ लाख ७१ हजार ८१६६ (३९%) गुन्हे पुन्हा वर्षाखेरीस प्रलंबित राहिले आहेत.**

☞ **प्रलंबित गुन्ह्याचे प्रमाण दरवर्षी सातत्याने वाढत असून हे प्रमाण कमी करण्यासाठी पोलिसांची व अधिकाऱ्यांचे संख्याबळ वाढवावे लागेल तसेच त्यांचे आधुनिकीकरण करावे लागेल.**

☞ **चोरीचे प्रमाण सातत्याने वाढत असून वर्ष २०१६ मध्ये मागील प्रलंबित चोरीचे गुन्हे धरून हा आकडा १ लाख ४ हजार ७२८ वर गेला आहे.**

# पोलिसांविरुध्दच ४ हजार ८२९ तक्रारी

## सर्वसामान्य जनता हतबल!

तक्ता क्र. ३

| वर्ष | पोलिसांविरुध्द तक्रारी | खातेनिहाय चौकशी | दंडाधिकाऱ्या मार्फत चौकशी | न्यायालयीन चौकशी | खोट्या तक्रारी/निराधार आरोप | दाखल गुन्हे | न्यायालयात पाठविलेले दोषारोप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२ | ६९२५ | ३९८ | १४ | ६५ | ४५४९ | ३८० | १७३ |
| २०१३ | ७२८० | ९५१ | १ | ८६ | ४१७२ | ४४२ | १७२ |
| २०१४ | ६५२८ | ७२७ | ८ | ६० | २३५५ | ४८७ | १६७ |
| २०१५ | ८००४ | ९३४ | ९ | २२ | ३९६२ | ५३६ | १९१ |
| २०१६ | ४८२९ | ४९४ | ५ | ६८ | १४३४ | - | १९६ |

*(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे -२०१६)*

- ☞ पोलिसांविरुध्दच्या तक्रारी सातत्याने वाढत असून वर्ष २०१५ मध्ये मागील ४ वर्षात सर्वात जास्त म्हणजे ८ हजार ४ तक्रारी दाखल झाल्या त्यापैकी ५३६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
- ☞ वर्ष २०१४ मध्ये ६८ पोलिसांची न्यायालयीन चौकशी करण्यात आली असून ४९४ पोलिसांची खातेनिहाय चौकशी करण्यात आली.
- ☞ वर्ष २०१६ मध्ये पोलिसांविरुद्ध १ हजार ४३४ खोट्या व निराधार तक्रारी करण्यात आल्या होत्या.

# राज्यात १ लाख २९ हजार ९४४ पोलीस शासकीय निवासापासून वंचित

## महाराष्ट्र राज्य पोलीस संख्याबळ आणि त्यांना उपलब्ध झालेली शासकीय निवासस्थाने

तक्ता क्र.४

| पद | मंजूर संख्याबळ | उपलब्ध निवासस्थाने | निवासस्थान नसलेले | निवासस्थान नसलेल्यांची %वारी |
|---|---|---|---|---|
| पोलीस अधिकारी | २०,३८५ | ६,९०२ | १३,४८३ | ६६.१४ |
| पोलीस कर्मचारी | २,०१,६५० | ८५,१८९ | १,१६,४६१ | ५७.७५ |
| एकूण | २,२२,०३५ | ९२,०९१ | १,२९,९४४ | ५८.५२ |

*(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे -२०१६)*

- ☞ आज राज्यातील पोलिसांची मंजूर संख्या २ लाख २२ हजार ३५ इतकी आहे त्यापैकी ९२ हजार ९१ पोलिसांना राहण्यासाठी निवासस्थाने उपलब्ध आहेत. तर उर्वरित १ लाख २९ हजार ९४४ पोलिसांना राहण्यासाठी आजही घरे उपलब्ध नाहीत.
- ☞ दि. १७ नोव्हेंबर २००९च्या शासन निर्णयानुसार किमान ८० % पोलिसांना निवासस्थाने उपलब्ध होणे गरजेचे होते मात्र ९ वर्षांनंतर ८५ हजार ५३७ पोलिसांना निकषानुसार निवासस्थाने उपलब्ध झालेली नाहीत.

## पोलिसांची १२ हजार पदे रिक्त, अपुऱ्या पोलिसांमुळे मुंबईसह राज्य असुरक्षित

राज्यातील पोलिसांचे एकूण मंजूर संख्याबळ २ लाख २२ हजार ३५ इतकी पदे मंजूर असून त्यापैकी १७ हजार ३८० पदे रिक्त असल्याचे वास्तव समोर आले आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे पोलिसांवर कामाचा ताण येत आहे. पोलीस दलातील अपुरे मनुष्यबळ, हुषार तपास अधिकाऱ्यांची कमतरता यामुळे मुंबई शहर वर्षागणिक असुरक्षित होत असल्याचा निष्कर्ष प्रजा फाऊंडेशनने पोलिसिंग, कायदा व सुव्यवस्थेसंबंधात काढलेल्या अहवालात म्हटले आहे. दक्षिण मध्य मुंबईतच सर्वाधिक गुन्ह्यांची नोंद झाली असून या परिसरातील ३६% नागरिकांना मुंबईत सुरक्षित वाटत नाही. गेल्या ५ वर्षात बलात्कार आणि विनयभंगाच्या तक्रारी नोंदविण्याचे प्रमाण वाढले असून तपास अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे गुन्हेसिध्दीचे प्रमाण घटले आहे. तसेच सामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी असलेल्या पोलीस नियंत्रण कक्षात ५१% पदे रिक्त असल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे.

## कैद्यांना सुविधा पुरवा!

### मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

राज्यभरातील तुरुंगात असलेल्या हजारो कैद्यांच्या आरोग्याबाबत जिल्हावार आहारतज्ज्ञांनी पूर्वसूचना न देता आकस्मिक करावयाची आहे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

## कारागृह-राज्यात ५ हजार ७७७ बंदी अतिरिक्त

तक्ता क्र. ५

कारागृहनिहाय सरासरी बंदी संख्येची अधिकृत बंदी क्षमतेशी %वारी (दि. २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत)

| कारागृहाचे नाव | अधिकृत बंदी | | | कारागृहात असलेले बंदी २०१७-१८ | | | | अधिकृत बंदी क्षमतेशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | अतिरिक्त कैदी | |
| अ) मध्यवर्ती कारागृह | | | | | | | | |
| येरवडा, पुणे | २३२३ | १२६ | २४४९ | ३७८० | २५८ | ४०३८ | १५८९ | १६५ |
| कोल्हापूर, कळंबा | १७५५ | ३४ | १७८९ | १५३३ | ४२ | १५७५ | -२१४ | ८८ |
| मुंबई | ८०४ | ० | ८०४ | २७०२ | ० | २७०२ | १८९८ | ३३६ |
| ठाणे | १०८० | २५ | ११०५ | २६८० | ८५ | २७६५ | १६६० | २५० |
| औरंगाबाद | ५४८ | ३१ | ५७९ | ११५१ | ९१ | १२४२ | ६६३ | २१५ |
| नाशिक रोड | ३११८ | ६० | ३१७८ | २६४० | ९९ | २७३९ | -४३९ | ८६ |
| नागपूर | १६९८ | १४२ | १८४० | १९०८ | ६० | १९६८ | १२८ | १०७ |
| अमरावती | ९३९ | ३४ | ९७३ | १०६० | ५२ | १११२ | १३९ | ११४ |
| तळोजा | २१२४ | ० | २१२४ | १८८० | ० | १८८० | -२४४ | ८९ |
| **एकूण** | **१४३८९** | **४५२** | **१४८४१** | **१९३३४** | **६८७** | **२००२१** | **५१८०** | **१३५** |
| **ब) जिल्हा कारागृह वर्ग -१** | **५८११** | **१७९** | **५९९०** | **५२३८** | **२२३** | **५४८१** | **-५०९** | **९१** |
| **क) जिल्हा कारागृह वर्ग -२** | **२३५७** | **५४९** | **२९०६** | **३४५१** | **५२६** | **३९७७** | **१०७१** | **१३७** |
| **ड) जिल्हा कारागृह वर्ग -३** | **१८४** | **२१** | **२०५** | **२२०** | **२०** | **२४०** | **३५** | **११७** |
| **एकूण** | **२२७४१** | **१२०१** | **२३९४२** | **३११०१** | **१४६५** | **२९७१९** | **५७७७** | **१३६** |

*(स्रोत : कारागृह सांख्यिकी)*

☞ वर्ष २०१६-१७ मध्ये मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह-१ जिल्हा कारागृह-२ व जिल्हा कारागृह-३ यांची एकत्रित बंदी क्षमता २३ हजार ९४२ इतकी होती. त्यामध्ये १ हजार २०२ महिला बंदींसाठी जागा होती. मात्र या कालावधीत २९ हजार ७१९ बंदी ठेवण्यात आले होते. त्यात १ हजार ४६५ स्त्री बंदी होत्या. म्हणजे उपलब्ध क्षमतेपेक्षा ३६ % म्हणजे ५ हजार ७७७ अधिकचे बंदी कारागृहात ठेवण्यात आले होते. हे एकाप्रकारे मानवी हक्कांचा भंगच म्हणावा लागेल.

☞ येरवडा, पुणे येथे अधिकृत बंदी क्षमता २ हजार ४४९ असून ४ हजार०३८ बंदी कोंबले होते. म्हणजे १ हजार ५८९ (६५ %) अधिकचे कैदी कारागृहात होते. तर मुंबईच्या कारागृहात अधिकृत क्षमता ८०४ होती मात्र या कारागृहात २ हजार ७०२ कैदी कोंबले होते. १ हजार ८९८ हे अधिकचे कैदी होते.

## अतिरिक्त तुरुंग उभारा - उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला आदेश

मुंबई व पुण्यासह राज्यभरातील तुरुंगामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याने आणि तुरुंगाची स्थिती समाधानकारक नसल्याने त्याविषयी चिंता व्यक्त करतानाच मुंबई व पुण्यात अतिरिक्त तुरुंगांची उभारणी करण्याकरिता राज्य सरकारने तीन महिन्यांच्या आत योग्य ती पावले उचलावीत, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिला.

# सहा वर्षांत १७८ कैद्यांचा मृत्यू

## कोठडीतील भयावह वास्तव

आरोपींच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस आणि तुरुंग प्रशासनाची असते; परंतु कोठडीत कैद्यांचे मृत्यू होतात. राज्यात सहा वर्षात तब्बल १७८ आरोपींचा कोठडीत मृत्यू झाला.

उच्च न्यायालयात दाखल याचिकांत पोलीस कोठडीतील मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येक ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पथदर्शी प्रकल्प म्हणून मुंबईतील २५ संवेदनशील पोलीस ठाण्यात कॅमेरे लावले जात आहेत.

### दहा वर्षांत चौकशी प्रक्रियाच नाही

फौजदारी दंडसंहितेनुसार आरोपीच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी पूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांमार्फत चौकशीची तरतूद होती. २००५ मधील कायदा दुरुस्तीनंतर दंडाधिकारी म्हणजे न्यायाधीशांमार्फत चौकशी होणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने संशयास्पद मृत्यूची माहिती तात्काळ दंडाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यानंतर त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून मृतदेहाच्या तपासणीचा अहवाल मिळवून मृत्यूच्या कारणांचा शोध घेणे हे कायदेशीर चौकशीत अभिप्रेत आहे, मात्र राज्यात गेल्या दहा वर्षात अशी प्रक्रिया राबवली जात नसल्याचे न्यायालयात उघड झाले.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागात दाखल झाल्या भ्रष्टाचाराच्या ९९४ तक्रारी

आलेख क्र. ५ : **तक्रारदारांची वर्गवारी** ( दिनांक ०१/०१/२०१५ ते १२/१०/२०१५ पर्यंत)




☞ वर्ष २०१५ मध्ये ९९४ भ्रष्टाचार विरोधी तक्रारी दाखल झाल्या असून सर्वात जास्त अनुसूचित जातीच्या लोकांनी तक्रारी दाखल केल्या आहेत. तर २२ तक्रारी अनुसूचित जमातीच्या लोकांनी दाखल केल्या असून वृद्ध तक्रारदारांची संख्या २३ आहे.

# भ्रष्टाचारात महसूल अधिकारी आघाडीवर

आलेख क्र. ६ **व्यवसायाप्रमाणे आरोपितांची वर्गवारी** (दि. ०१/०१/२०१५ ते १२/१०/२०१५ पर्यंत)




☞ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत वेगवेगळ्या विभागांतर्गत वर्ष २०१५ मध्ये १ हजार २८७ आरोपी असून त्यामध्ये सर्वात जास्त आरोपी महसूल अधिकारी आहेत. त्यांची संख्या ३२७ (२५%) असून त्या खालोखाल पोलीस अधिकारी २९४ (२३%) आहेत.

# भ्रष्टाचारात वर्ग - ३ चे कर्मचारी ६५%

## वर्गवार आरोपी (दि. ०१/०१/२०१५ ते १२/१०/२०१५ पर्यंत)

आलेख क्र. ७




☞ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत शासनाच्या सेवेतील व खाजगी क्षेत्रातील आरोपींची संख्या १२९४ इतकी असून सर्वात जास्त आरोपी हे वर्ग - ३ मधले आहेत. त्यांची संख्या ८३८ (६५%) असून खाजगी व्यक्तींची संख्या १७७ आहे तर वर्ग १ चे ६७ अधिकारी आरोपी असल्याचे आढळून आले आहे.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत पुणे आघाडीवर

## सापळा कारवाई परिक्षेत्र (दि. ०१/०१/२०१५ ते १२/१०/२०१५ पर्यंत)

आलेख क्र. ८




☞ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, ठाणे, अमरावती, नांदेड सह मुंबई या परिक्षेत्रामध्ये ९९४ ठिकाणी कारवाई केली. त्यापैकी पुण्यामध्ये सर्वात जास्त १८५ (१९%), नाशिक १४९ (१५%), औरंगाबाद १५१ (१५%), तर नागपूर १३३ (१३%) इतकी आहे.

# भ्रष्टाचारामध्ये पुरुषांचे प्रमाण ९५ %

आलेख क्र. ९




☞ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने वर्ष २०१५ या वर्षात १२८९ आरोपी पकडले असून त्यापैकी महिलांची संख्या ७० (५.४३%) इतकी आहे. तर १,२१९ (९४.५७%) आरोपी पुरुष आहेत.

## रोजगार हमी योजनेत होतोय सर्वात जास्त भ्रष्टाचार

४३ योजनांमध्ये भ्रष्टाचार

☞ वर्ष २०१४-१५ ते २०१६-१७ या ३ वर्षात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाच्या विविध योजनांसंदर्भात सापळा गुन्ह्यांची नोंद केली त्यात ४३ योजनांचा सहभाग होता. या विभागाने सापळा रचून २४३ गुन्ह्यांची नोंद केली असून सर्वात जास्त ४९ (२१%) गुन्हे हे रोजगार हमी योजनेचे होते.

☞ घरकुल योजना -२६, इंदिरा आवास -२५, निर्मल भारत अभियान -१७, पाणी पुरवठा नळ योजना -१०, ठिबक सिंचन योजना -१०, शालेय पोषण आहार -१० असा समावेश आहे.

## सापळा रचून वसूल केले ३९ लाख ९१ हजार १७८ रुपये

### वेगवेगळ्या विभागांचे सापडले २५२ कर्मचारी

- ☞ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १ जानेवारी २०१८ ते १८ मार्च २०१८ या कालावधीत विविध विभागांतर्गत कारवाई करीत २५२ अधिकारी व कर्मचारी यांना अटक केली व त्यांच्याकडून रु. ३१ लाख ९१ हजार १७८ वसूल करण्यात आले.
- ☞ सर्वात जास्त अधिकारी -५६ हे महसूल विभागाचे सापडले असून त्यांच्याकडून रु. ३ लाख ९९ हजार ३०० ची रक्कम सापळा रचून नेमण्यात आली.
- ☞ वन विभागाच्या ९ अधिकाऱ्यांना सापळा रचून पकडले असून त्यांच्याकडून रु. ११ लाख २३ हजार ७०० रक्कम वसूल करण्यात आली.

## पाच विभागांच्या ११ अधिकाऱ्यांकडून ४ कोटी १२ लाखांची अपसंपदा जप्त

- ☞ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १ जानेवारी २०१८ ते १८ मार्च २०१८ या कालावधीमध्ये महसूल, महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हा परिषद तसेच म्हाडा विभागाच्या ११ अधिकाऱ्यांनी अपसंपदा बाळगल्या प्रकरणी ११ अधिकाऱ्याना अटक केली असून सर्वात जास्त अधिकारी म्हाडा (३), महानगरपालिका (३), महसूल (२), जिल्हा परिषद (२) व प्रादेशिक परिवहन सेवा (१) असा समावेश आहे. त्यांच्याकडून रु. ४ कोटी १२ लाख १ हजार १७५ मालमत्ता जप्त केली आहे.
- ☞ सर्वात जास्त अपसंपदा बाळगलेल्या विभागामध्ये म्हाडा या विभागामध्ये म्हाडा या विभागातील वर्गाच्या (१) अधिकाऱ्यांचा समावेश असून त्यांच्याकडून रु. ३ कोटी १६ लाख १७ हजार ९८६ कोटी मालमत्ता पकडण्यात आली आहे.

*(स्त्रोत: लाचलुचपत प्रतिबंध विभाग महाराष्ट्र राज्य -ACB)*